CHANGE for BETTER

दि –.१३ नोव्हेंबर २०११
मा,संपादक .
सप्रेम नमस्कार

**विषय –'Change for Better' त्रैमासिकाच्या वर्धापन आवृत्तीचे प्रकाशन**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळातर्फे 'Change for Better' या त्रैमासिकाच्या वर्धापन आवृत्ताचे प्रकाशन रविवार दिनांक १३ नोव्हेंबर २०११ रोजी महाराष्ट्र स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे येथे झाले.

महाराष्ट्र ज्ञान महामंडळातर्फे प्रकाशित होणारे 'Change for Better' या वैचारिक त्रैमासिकाने व्दितीय वर्षात पदार्पण केले. **मा. श्री. सुरेश प्रभू** माजी केंद्रीय मंत्री, भारत सरकार यांनी समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविले. या वर्धापन आवृत्तीचे **श्री. सुरेश प्रभू यांच्या हस्ते प्रकाशन झाले.**

या वर्धापन आवृत्ती निमित्त **"अर्थक्रांती - भारतीय अर्थकारणाचे पुनर्जीवन"** या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता .या कार्यक्रमात भारतातील कोट्यवधी लोकांना समृद्ध करणारी आदर्श अर्थव्यवस्था कशी असावी याचे सादरीकरण व विचार प्रदर्शित केले. तसेच या विषयावरील मुखपृष्ठ असलेल्या ' Change for Better' या त्रैमासिकाचे प्रकाशन याप्रसंगी झाले. या कार्यक्रमामध्ये श्री. अनिल बोकील यांनी अर्थक्रांतीच्या प्रस्तावाचे मौलिक सादरीकरण केले ते पुढीलप्रमाणे

१. सध्या अस्तित्वात असलेली करप्रणाली (केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक प्रशासनाचे सर्व कर) पूर्णत रद्द करणे. (आयात कर अथवा कस्टम ड्यूटी वगळता) देशातील सर्व म्हणजे केंद्र, राज्य आणि पालकांचे , असे सुमारे ३२ कर
२. सरकारी महसुलासाठी फक्त बँक व्यवहार कर Bank Transaction Tax हा सिंगल पॉईंट डिडक्शन टॅक्स लागू करणे. बँकेद्वारे होणा-या प्रत्येक व्यवहारावर एका निश्चित प्रमाणात वजावट करणे. (उदा. २ टक्के प्रती व्यवहार) वजावट फक्त जमा खात्यावरच (रिसिव्हिंग एंड अकौंटलाच) व्हावी, ही २ टक्के वजावट निश्चित प्रमाणत केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक प्रशासन व त्या विवक्षीत बँकेच्या खात्यावर वर्ग करण्यात यावी. (उदा. ०.७० टक्के केंद्र सरकार, ०.६० टक्के राज्य सरकार, ०.३५ टक्के स्थानिक प्रशासन संस्था व ०.३५ टक्के बँक)
३. रोखीच्या कुठल्याही व्यवहारावर बँक व्यवहार कर (Bank Transaction Tax) लागू असणार नाही.
४. सध्या चलनात असलेल्या रु.५० पेक्षा जास्त दर्शनी मूल्य असलेल्या चलनाचे उच्चाटन करणे. (यामुळे लोकांना बँकेमार्फत व्यवहार करणेच सोयीचे होईल. परिणामी शासनाच्या महसुलात

लक्षणीय वाढ होईल) काळया पैशांचा राक्षस उभा करणा-या मोठया नोटा नाहीत. त्यामुळे तेथे भारतात होतात तसे रोखीने मोठे व्यहार होणार नाहीत.

५. शासनाची काही विशिष्ठ आर्थिक मर्यादेपर्यंतच रोखीच्या व्यवहारांना कायदेशीर मान्यता अपेक्षित (जसे रु.२००० पर्यंतचे व्यवहार). अर्थातच या मर्यादेपुढील रोखीच्या व्यवहारांना कायदेशीर संरक्षण मिळू शकणार नाही. अशा रोख व्यवहार मर्यादा निश्चितीकरणामुळे बँक व्यवहारास चालना मिळून शासकीय महसुलात लक्षणीय वाढ अपेक्षित.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यवस्थापकीय संचालक श्री. विवेक सावंत यांनी केले आणि आभार प्रदर्शन श्री. संदीप कुलकर्णी यांनी केले.

**ता.क.- कार्यक्रमाच्या तपशीलवार बातमी व फोटोकरीता अथवा अधिक माहितीसाठी श्री.संदीप कुलकर्णी – 07350000370, sandeepk@mkcl.org यांच्याशी संपर्क साधावा.**